डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १६ फेब्रुवारी, १९४९ अंक ७


## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी:— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
( मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापन साल १९११

चेअरमनः—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,३९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २७,२१,००० |
| ठेवी | रु. ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. ८,९७,३७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५३ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरी-कडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला
## ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादिसाठीं चौकशी कराः—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
तार : SAHYOG फोन : ३४५१९

औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्
( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )
( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. )
( ३ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
( ले:—आर. एम. तळपदे, किं. १२ आ. )



नवीन पुष्कळ निघाले, तरी
## तुळजाराम मोदी, सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.



## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.



तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठीं आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**कापसाच्या उत्पादनांत वाढ**—हिंदुस्थानांतील कापूस आणि ताग ह्यांचें उत्पादन वाढविण्यासाठीं काय करावें ह्यासंबंधीं तपासणी करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. ह्या दोन पिकांसंबंधीं आंकडेवार माहिती मिळविण्याच्या सूचना प्रांतिक सरकारांना देण्यांत आल्या असून मध्यवर्ती सरकारचे अन्नमंत्री श्री. जयरामदास दौलतराम ह्याविषयासंबंधीं एक परिषद लौकरच दिल्ली येथें भरवितील अशी वार्ता आहे.

**बॉइलर संबंधीं कायद्यांत दुरुस्ती हवी**—बॉइलर्स संबंधींचा सध्याचा कायदा इंग्लिश बॉइलर्सना अनुलक्षून केलेला आहे. त्यामुळें हिंदुस्थानांतील उद्योगपती अमेरिकन बनावटीचे बॉइलर्स घेत नाहींत, अशी तक्रार दिल्लींतील अमेरिकन वकिलातीनें हिंदुस्थान सरकारकडे केली आहे. अमेरिकन बॉइलर्स इंग्लिश बॉइलर्सपेक्षां कोणत्याही तऱ्हेनें कमी प्रतीचे नाहींत. तेव्हां सध्याच्या तद्विषयक कायद्यांमुळें अमेरिकेविरुद्ध पक्षपात केला जातो, असें अमेरिकेचें म्हणणें आहे. ह्या कायद्यांत दुरुस्ती करण्यासंबंधीं विचार करण्याकरितां सेंट्रल बोर्ड ऑफ बॉइलर्सची बैठक लवकरच भरणार आहे.

**हातमागाच्या कापडाची निर्यात**—पाकिस्तानला हातमागाचें कापड पाठविण्याची खुली परवानगी हिंदुस्थान सरकारनें दिली आहे असें समजतें. ही परवानगी तीन महिनेपर्यंत चालू राहणार आहे. मद्रास प्रांतांत हातमागाचें कापड बऱ्याच प्रमाणांत सांठून राहिल्यामुळें विणकर वर्ग संकटांत सांपडला आहे. हें कापड निर्यात केलें, तर त्याच्या अडचणी बऱ्याच प्रमाणांत कमी होतील, म्हणून निर्यातीचा निर्णय घेण्यांत आला आहे.

**मोटारीच्या कायद्यांत दुरुस्ती**—मुंबई सरकारनें मोटारींच्या कायद्यांत दुरुस्ती करणारें बिल विधिमंडळांत आणण्याचें ठरविलें आहे. एखादी मोटार विकली गेली आणि तीसंबंधींचा कर पहिल्या मालकानें दिला नसला तर तो नव्या मालकाकडून वसूल करून घेण्याची सोय कायद्यांतील संकल्पित दुरुस्तीनें करण्यांत येणार आहे. सध्याच्या कायद्यांत, मोटार विकणाऱ्यानें सौदा मोटारींची नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याला कळविला पाहिजे असें कलम नाहीं. ही दुरुस्ती झाल्यानंतर सुद्धां पहिला मालक कराच्या जबाबदारींतून सुटेल असें मात्र नाहीं.

**हिंदुस्थानांतील परकीय भांडवल**—अमेरिकेंतील 'बिझिनेस वुइक' ह्या मासिकानें हिंदुस्थानांतील परकीय भांडवलाबद्दल पुढीलप्रमाणें मत व्यक्त केलें आहे:—"प्रत्येक नव्या धंद्यांतील ५१ टक्के भांडवल हिंदी नागरिकांच्या मालकीचें असावें, ही पं. नेहरूंची कल्पना ते सौम्य करण्यास तयार आहेत. कमी जरूरीच्या अशा उद्योगधंद्यांत तरी परकीय भांडवलाला अधिक वाव मिळेल असें वाटतें." दिल्लींतील अमेरिकन वकिलातीच्या माहितीप्रमाणें बऱ्याच अमेरिकन कंपन्या बदलत्या सरकारी धोरणाच्या घोषणेची वाट पहात आहेत, असें समजतें.

**इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण लांबलें नाहीं?**—देशांतील सध्याची आर्थिक अस्थिरता, तांत्रिक अडचणी आणि नाणें बाजारावर होणारा संभाव्य परिणाम लक्षांत घेऊन, इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण करणें तूर्त शक्य होणार नाहीं, असें हिंदुस्थान सरकारचे अर्थमंत्रि, डॉ. जॉन मथाइ, ह्यांनीं जाहीर केलें होतें. परंतु ह्या प्रश्नाचा फेरविचार होणार आहे.

**ब्रिटिश कंपनीविरुद्ध निदर्शन**—तेहरान (इराण) मधील १,००० विद्यार्थ्यांनीं पार्लमेंटच्या चौकांत ब्रिटनविरोधी निदर्शन केलें. विद्यार्थ्यांनीं केलेल्या घोषणांत अँग्लो-पार्शिअन कंपनीचा तेल काढण्याचा परवाना रद्द करण्यांत यावा आणि इराणमधील ब्रिटिश इंपीरिअल बँकेनें आपले व्यवहार बंद करावे, अशा दोन मागण्या करण्यांत आल्या.

**बडोद्यांतील दुय्यम शिक्षणाच्या शाळा**—बडोदा सरकारनें नेमलेल्या दुय्यम शिक्षण कमिटीचा अहवाल आतां तयार झाला आहे. कमिटीनें आपल्या अहवालांत शिफारस केल्याप्रमाणें सरकारनें खाजगी शाळांना मदत देण्यासाठीं म्हणून ५ लाख रुपये बाजूला काढून ठेवले आहेत. खाजगी शाळांना त्यांच्या मंजूर खर्चाच्या ३३⅓ टक्के रक्कम, वरील रकमेंतून मदत म्हणून देण्यांत येणार आहे.

**जागतिक कामगार संघाचा नवा पवित्रा**—जागतिक कामगार संघाच्या कार्यकारी कमिटीनें मागासलेल्या देशांतील कामगार चळवळींना मदत करण्यासाठीं म्हणून एक फंड उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या कामगार संघटनेंतून ब्रिटनच्या आणि फ्रान्सच्या प्रतिनिधींनीं आपलें अंग नुकतेंच काढून घेतलें असून, ही संघटना कम्युनिस्टांच्या आहारीं गेली आहे असा आक्षेप आहे.

**धरण-विषयक तज्ञाचा अभिप्राय**—अमेरिकेंतील टेनेसी व्हॅली ॲथॉरिटी ह्या संस्थेचे माजी अध्यक्ष मि. ए. ई. मॉर्गन सध्या हिंदुस्थान सरकारला शिक्षणविषयक सल्ला देत असतात. त्यांनीं अमेरिकेंतील एका वृत्तपत्रांत असें लिहिलें आहे कीं, हिंदुस्थाननें धरणें, विजेची निर्मिती, पुरांचें नियंत्रण, इत्यादि कार्यक्रमाकडे पुष्कळ लक्ष पुरविलें आहे. हिंदुस्थानचा हा कार्यक्रम पुरा झाला म्हणजे तो देश अमेरिकेशींही स्पर्धा करूं लागेल. ह्या कार्यक्रमांपैकीं कांहीं धरणें टी. व्ही. ए. पेक्षांही मोठीं होतील.

**सांडूर संस्थानची खनिज समृद्धि**—मद्रास प्रांतांतील बल्लारीजवळ सांडूर संस्थान आहे. ह्या संस्थानांत लोखंड व मँगेनीज ह्यांचा विपुल सांठा असल्याचें आढळून आलें आहे. त्याशिवाय सोनें आणि तांबें ह्या धातूही सांपडूं शकतील. लोखंडाच्या मातीचा सांठा सुमारें १७ कोटी टन आणि मँगेनीजचा सांठा सुमारें २५ लाख टन असावा असा अंदाज करण्यांत आला आहे. जळण आणि पाणी ह्यांच्या अभावीं संस्थानची खनिज संपत्ति कारणीं लावतां आली नाहीं, असें मध्यवर्ती सरकारच्या तज्ञाचें मत आहे. म्हैसूर आणि हैद्राबाद संस्थानांतून जरूर तो कच्चा माळ आणल्यास संस्थानांत रंगरोगणांचा कारखानाहि निघूं शकेल.

**नेपाळमध्यें बिनतारीचा प्रसार**—नेपाळमधील बहुतेक सर्व महत्त्वाच्या ठिकाणांहून खाटमांडू ह्या राजधानीच्या शहराला बिनतारीनें संदेश देण्या-घेण्याची सोय करण्यांत येत आहे.

कुशलतेचा फायदा एकट्या सारस्वत बँकेसच दिला, असें नाहीं. इतरही संस्थांना दिला आहे. १९२९ सालीं त्यांनीं डेक्कन मर्चेंटस् को-ऑपरेटिव्ह बँकेची पुनर्घटना करण्यासाठी बरीच मदत केली व त्या संस्थेचे सेक्रेटरी या नात्यानें तीन वर्षें सेवा केली. १९३८ सालीं डबघाईस आलेल्या दादर को-ऑपरेटिव बँकेची पुनर्घटना केली. औंध स्टेट बँकेची स्थापना करण्याच्या कामीं औंध दरबारास मोलाची मदत केली. भोर संस्थानांत भोर स्टेट बँक स्थापन करण्यासाठी एवढी मेहनत केली कीं, भोरच्या पंतसचिवांनीं त्यांना त्या बँकेच्या चेअरमनच्या जागेवर नेमिलें. पुणें येथें बँक ऑफ महाराष्ट्र या संस्थेचे श्री. वर्दे उपाध्यक्ष होते. या बँकेच्या मुंबईत तीन शाखा आहेत. त्यांचा कारभार श्री. वर्दींच्या देखरेखीखालीं चालत असे. बँकिंगनंतर विम्याच्या धंद्यांतही श्री. वर्दे यांनीं लक्ष घातलें आहे. दि. ब. काजोंनीं स्थापन केलेल्या वसंत इन्शुरन्स कंपनीचे, व्हॅनगार्ड इन्शुरन्स आणि व्हॅनगार्ड फायर व जनरल इन्शुरन्स कंपनीचे अशा तीन कंपन्यांचे डायरेक्टर आहेत. किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी व त्या कंपनीची बहीण म्हैसूर किर्लोस्कर लिमिटेड, हरिहर, व किर्लोस्कर ऑइल एन्जीन्स लि. पुणें या कंपन्यांत ते डायरेक्टर आहेत. जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स, भिवंडी आणि त्रावणकोर येथील त्रावणकोर इलेक्ट्रिक केमिकल इंडस्ट्रीज लि. या यांत्रिक कारखान्यांच्या कंपन्यांचेही ते डायरेक्टर आहेत. सहकारी संस्थांपैकीं मुंबई स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स या संस्थेचे श्री. वर्दे डायरेक्टर आहेत. गौड सारस्वत को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीच्या व्यवस्थाक मंडळाचे ते सभासद आहेत.

स्वस्तिक सेफ डिपॉझिट व इन्व्हेस्टमेंट लि. ही कंपनी १९४० सालीं त्यांनीं स्थापिली आणि गिरगांव टापूंतील लोकांस सेफ डिपॉझिट व्हॉल्टच्या सोई मिळवून दिल्या. दुसऱ्या वर्षापासून ही कंपनी डिव्हिडंड देत आहे. आणखीही कांहीं कंपन्यांच्या डायरेक्टरांच्या जागेवर ते आहेत.

### यशाचें रहस्य

वर दिलेल्या कंपन्यांच्या नामावलीवरून सकृद्दर्शनीं जी गोष्ट दिसते ती ही कीं, औद्योगिक क्षेत्रांत श्री. वर्दींनीं विविध प्रकारच्या व विविध ठिकाणच्या धंद्यांत लक्ष घातलें आहे. त्यांच्या स्वभावाची ज्याला यत्किंचितही माहिती असेल तो, ते डायरेक्टरची खुर्ची फीपुरती मुकाट्यानें एक क्षणहि अडवीत असतील असें कधींही म्हणणार नाहीं. प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्र विचार करणें, आपलें मत स्पष्टपणें सांगणें, किंबहुना आग्रहानें प्रतिपादणें, आपला दृष्टिकोन दुसऱ्याच्या नजरेस आणणें, असे त्यांचे स्वभावविशेष आहेत.

अभ्युदयाला आवश्यक असे कित्येक कल्याण गुण श्री. वर्दींकडे आहेत. पहिला म्हणजे निरलसता. काम करावयाची दुर्दमनीय हौस. ते नेहमीं कांहींना कांहीं कामांत मग्न असतात. थोडासा वेळ मिळाला तर त्यांत सहकारी चळवळी, बँकिंग वगैरे विषयांच्या पुस्तकांचें वाचन चालू असतें. न थकतां एकसारखे श्रम करावयाची तयारी हा दुसरा गुण. निरनिराळ्या कंपन्यांच्या सभांसाठी किंवा व्यवसायासाठी त्यांना एकसारखें फिरावें लागतें. पण त्या फिरण्याचा त्यांना कंटाळा किंवा थकवा वाटत नाहीं. बसल्या ठिकाणीं आणि मिळेल त्या वेळीं त्यांना झोंप घेऊन इंद्रियांना ताजेतवाने करतां येतें. झोंपेची तक्रार किंवा भूक नसल्याची तक्रार किंवा प्रकृतीसंबंधीं तक्रार कोणी अद्याप ऐकिलेली नाहीं; स्वभावाचा शांतपणा असून कितीही अप्रिय गोष्ट झाली तरी चिडणें किंवा गडबडणें त्यांच्या स्वभावास माहीत नाहीं.

("महाराष्ट्र सारस्वत"च्या आधारें)

### नव्या भांडवल उभारणीस परवानगी

| कंपनीचें नांव | धंदा | परवानगीची रक्कम (रु.) |
|---|---|---|
| बेळगांव बँक लि. बेळगांव | बँकिंग | १ लाख |
| भारत एअरवेज लि. ८ रॉयल एक्सचेंज कलकत्ता | विमानवहातूक | ५० लाख |
| नलंद एअरवेज लि. एक्सिबिशन रोड पाटणा | विमानवहातूक | २० लाख |
| बर्न अँड कं. लि. १२ मिशन रो, कलकत्ता | एंजिनिअरिंग | ७५ लाख |
| साठे बिस्किट अँड चॉकोलेट वर्क्स लि. ८२० भवानी पेठ पुणें. | बिस्किटें-चॉकोलेटचा कारखाना | २० लाख |
| त्रावणकोर टायर अँड रबर कं. लि. | टायर व रबराच्या वस्तूंचा कारखाना | ३ कोटी |
| त्रावणकोर रेयॉन्स लि. | कृत्रिम रेशीम व पारदर्शक कागद, ह्यांचा कारखाना | ५० लाख |
| बागलकोट सिमेंट कं. लि. विजापूर | सिमेंटचा कारखाना | १ कोटी |


# महत्त्वपूर्ण मूल्यमापन

## प्रगतीचा आणखी एक टप्पा

व्याजाचा दर कमी राखण्याचें सरकारी धोरण

व वाढता खर्च असूनहि पूर्वीप्रमाणेंच बोनस

१० व्या मूल्यमापनांतील ठळक गोष्टी

| | |
|---|---|
| मिळालेल्या निव्वळ सरासरी व्याजाचा दर | ३·३६ टक्के |
| मूल्यमापनासाठीं गृहीत धरलेला व्याजाचा दर | ३·०० „ |
| सरासरी खर्चाचें प्रमाण | ८·३८ „ |
| एकूण चालू काम | ११४४ लाखांवर |
| एकूण दिलेली क्लेमची रकम | ११८ लाखांवर |

विमेदारांना बोनस

रु. १० दरसाल दरहजारीं रु. ८

(हयातीनंतरच्या विम्यांना) (हयातींतील विम्यांना)

कोणत्याहि कसोटीला उतरलेली एकमेव विमासंस्था

विमा संरक्षणासाठीं अगर एजन्सीसाठीं लिहा अगर भेटा

शाखा कचेरी—(पुणें शाखा)— १७९ बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, बेलबागेजवळ, पुणें नं. २

कृ. य. जोशी, बी. ए., एफ. आय. ए., मॅनेजर.

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

सातारा.

## वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., सातारा.

### कंपनीच्या १० व्या मूल्यमापनासंबंधीं अधिक माहिती.

कंपनीच्या संस्थापनेपासून १९४८ मध्यें ३५ वर्षे पूर्ण झालीं. १९४७ अखेरच्या पंच वार्षिक मुदतीचें कंपनीचें दहावें मूल्यमापन यशस्वीरीत्या पुरें झालें असून त्याप्रमाणें कंपनीच्या व्यवहारांत साडे तेवीस लाखावर वाढावा वा नफा झाल्याचें आढळून आलें आहे. गेल मूल्यमापनाचे वेळीं व्याजाचा दर साडेतीन टक्के गृहीत धरला होता तो या खेपेस तीन टक्केच धरणेंत आला आहे. सर्व प्रकारच्या निधींची (रिझर्व्हसची) संपूर्णपणें तरतूद केल्यानंतर कंपनीचे मॅनेजर व अॅक्चुअरी श्री. बाळासाहेब जोशी, बी. ए., एफ. आय. ए. यांनीं शिफारस केल्याप्रमाणें वरील नफ्याचे रकमेंतून १९४२ अखेरच्या मूल्यमापनांतील नफ्याप्रमाणें कंपनीच्या नफ्यासह योजनेखालीं असणाऱ्या हयातींतील पॉलिसींना दरसाल दर हजारीं रु. ८ व हयातीनंतरच्या पालिसींना दरसाल दर हजारीं रु. १० प्रमाणें रिव्हर्शनरी बोनस ता.२६-१२-१९४८ रोजीं भरलेल्या भागीदारांच्या असाधारण सभेंत मंजूर झालें आहे.

एकूण हिंदुस्थानांतील कंपन्यांचें कामकाज सरकारी रिपोर्टवरून पाहतां असें दिसतें कीं सुमारें १९० चे वर असलेल्या एकूण कंपन्यांपैकीं ३१-१२-१९४६ अखेर ३२ कंपन्यांनीं आपलीं मूल्यमापनें केलीं आहेत. या ३२ कंपन्यांपैकीं १२ कंपन्यांना मूल्यमापनांत तोटा आला असून २० कंपन्यांना नफा झाला आहे परंतु फक्त ९ कंपन्यांनींच बोनस जाहीर केलें आहे. या बहुतेक कंपन्यांचे बोनसचे दर दरसाल दर हजारीं ८ व ६ यापेक्षां अधिक नाहींत.

उत्तरोत्तर कमी होत जाणारे व्याजाचे दरामुळें व सध्याचे सरकारी धोरणामुळें व वाढत्या व्यवस्थाखर्चामुळें कंपन्यांचे उत्पन्नावर त्याचा परिणाम झाला असून कित्येक कंपन्यांस बदललेल्या परिस्थितीस अनुरूप अशी वरचेवर आपल्या पॉलिसीचे हप्त्यांत वाढ करावी लागली आहे. परंतु या कंपनीचे हप्ते त्या मानानें माफक असून विमा हप्त्याचे दर व जाहीर केलेलें बोनस हीं दोन्ही विचारांत घेतां या कंपनीनें इतर मोठ्या कंपन्यांमध्येंही फार मोठ्या मानाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. त्याप्रमाणें आजपर्यंत एकूण देण्यांत आलेल्या बोनसची सरासरी पाहतां व रिन्युअल खर्चाचें प्रमाण पाहतां कंपनीनें अखिल हिंदुस्थानांत या व्यवसायांत फारच वरचा दर्जा प्राप्त करून घेतला आहे. गेल्या पांच वर्षांतील प्रगतीचे आकडे थोडक्यांत खालीं दिले आहेत. प्रत्यक्ष मूल्यमापनाचे रिपोर्टवरून सावंत तपशील उपलब्ध होतच आहे. त्याबरोबरच १९४७ व १९४८ सालीं पुष्कळ कंपन्यांचे नवीन कामांत सर्वसाधारण युद्धकालाचे मानानें पाहतां घटच येत आहे. परंतु त्या दृष्टीनें पाहतां या कंपनीचें पाऊल निश्चितपणें प्रगतिपथावर आहे. १९४६ मध्यें २ कोटींचे नवीन काम होऊन १९४७ मध्यें २ कोटी, २१ लाखांवर नवीन काम गेलें आहे. १९४८ मध्येंही त्यांत वाढ झालेली आहे.

| | १९४२ अखेरचें मूल्यमापन | १९४७ अखेरचें मूल्यमापन |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| १ एकूण चालू काम | ५,६३,९४,७४३ | ११,४४,१९,६५५ |
| २ वार्षिक हप्त्याचें उत्पन्न | २८,०९,६२३ | ६१,६२,१९४ |
| ३ लाइफ फंड | १,६२,९४,०३१ | ३,२५,३६,८३६ |
| ४ मूल्यमापनांतील नफा वा वाढावा | ६,७५,७९२ | २३,५२,०५१ |
| ५ बोनस, दरसाल दर हजारी | १० होल लाईफ<br>८ एन्डोऊमेन्ट | १० होल लाईफ.<br>८ एन्डोऊमेन्ट |

### श्री. वर्दे ह्यांचा सत्कार

महाराष्ट्र बँकेचे उपाध्यक्ष श्री. वामनराव वर्दे ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या मुंबई लोकल बोर्डाचे डायरेक्टर म्हणून सरकारनें नेमणूक केली. ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं महाराष्ट्र बँकेच्या संचालकांनीं रविवार ता. १३ रोजीं पुणें येथें गोखले हॉलमध्यें सत्कारसभारंभ घडवून आणला. ह्या सभारंभास पुण्यांतील बँकांचे संचालक, व्यवस्थापक, त्याचप्रमाणें प्रमुख भागीदार, ठेवीदार, इत्यादि गृहस्थ उपस्थित होते. नेक ना. बाबासाहेब जयकर ह्यांची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत आली होती. बँकेचे चेअरमन श्री. धोंडूमामा साठे ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर श्री. आ. रा. भट, श्री. दा. वि. गोखले, श्री. श्री. वा. काळे, श्री. बापूसाहेब गुप्ते, श्री. मो. रा. ढमढेरे, इत्यादींचीं श्री. वर्दे ह्यांच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं. अध्यक्षांच्या हस्तें श्री. वर्दे ह्यांस चांदीच्या पुस्तकाचा अहेर करण्यांत आला. श्री. वर्दे ह्यांनीं समयोचित आभार मानल्यावर, अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत रिझर्व्ह बँकेवरील तीनहि महाराष्ट्रीय प्रतिनिधींना महाराष्ट्राच्या पाठिंब्याची ग्वाही दिली. बँकेचे मॅनेजर श्री. जोग ह्यांनीं आभारप्रदर्शन केलें.

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें
(वार्षिक सभाः २७-२-४९)

वरील बँकस १९४८ सालीं १६ लक्ष रुपये वसूल भांडवलावर, ४ लक्ष १० हजार रु. रिझर्व्ह व इतर फंडांवर आणि २ कोटी, १८½ लक्ष रु. खेळत्या भांडवलावर २,०५,२०९ रु. निव्वळ नफा झाला. एकूण जिंदगीपैकीं ९६½ लाखांचीं कर्जें दिलेलीं असून ८४½ लाखांची इनव्हेस्टमेंट आहे. २६½ लक्ष रु. रोख व बँकांकडे शिल्लक आहेत. बँकेच्या नियोजित सेफ डिपॉझिट व्हॉल्टची कांहीं साधनसामुग्री येऊन पडली आहे. बोर्डानें म. गांधी स्मारक निधीस ७,५०० रु. देणगी दिली. बँकेची पोट-कंपनी दि महाराष्ट्र एक्झिक्यूटर अँड ट्रस्टी कंपनी हिला ट्रस्टी व एक्झिक्यूटरचें काम अपेक्षेप्रमाणें मिळत नाहीं, असें दिसतें. अॅक्सेप्टन्स फीजच्या रूपानें सबंद वर्षांत फक्त ५० रु. जमा आहेत आणि इनव्हेस्टमेंटवरील व्याज हेंच तिच्या उत्पन्नाचें (४,६०० रु.) मुख्य साधन आहे.

### दि प्रेसिडेन्सी इं. बँक लि., पुणें
(वार्षिक सभाः २५-२-४९)

वरील बँकेनें १९४८ सालीं ७१ लक्ष रु. खेळत्या भांडवलावर ७२,२१२ रु. निव्वळ नफा मिळविला. बँकेचें वसूल भांडवल ७,१५,१६५ रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ९५ हजारांचे आहेत. बँकेकडे ५९ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत, त्यापैकीं २३ लाखांचा चालू खात्यावरील आहेत. बँकेनें ३४ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं असून तिचेजवळ २१ लक्ष रुपयांचे रोखे आहेत आणि १३½ लक्ष रु. रोख व इतर बँकांत ठेवले आहेत. डायरेक्टरांनीं ३½% करमाफ डिव्हिडंड सुचविलें आहे. म. गांधी स्मारक निधीस ५,००० रु. देण्यांत येणार आहेत.

### स्त्री-मासिकाचा आरोग्य विशेषांक

देशाचें मनुष्यबळ निवळ त्याच्या मोठ्या लोकसंख्येवर अवलंबून नसतें; नागरिकांचें आरोग्य, दीर्घायुष्य, कार्यक्षमता, ह्यांच्या प्रभावीपणावरच तें मुख्यतः अवलंबून असतें. हिंदुस्थानाची लोकसंख्या प्रचंड असली, तरी ती दुबळी असून, जननाच्या व मृत्यूच्या मोठ्या प्रमाणामुळें शक्तिऱ्हासक आहे. स्त्रियांच्या आरोग्याशीं नव्या पिढीच्या कर्तृत्वाचा निकटचा संबंध आहे. ह्या व्यापक दृष्टीनें स्त्री मासिकाच्या आरोग्य विशेषांकाकडे पाहिलें असतां, त्यानें स्त्रियांच्या आरोग्याच्या विविध प्रश्नांकडे वाचकांचें लक्ष वेधून महाराष्ट्रीय स्त्री-वर्गाचीच नव्हे, तर सर्वच जनतेची उत्कृष्ट सेवा केली आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १६ फेब्रुवारी, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थनूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## सहकारी बँकांचे बिगर–सहकारी व्यवहार

### व्यापारी बँकिंग क्षेत्रावर आक्रमण ?

प्रांतिक व मध्यवर्ती सहकारी बँकांनीं व्यापारी बँकांच्या कार्य-क्षेत्रांत प्रवेश केला आहे तो इष्ट नाहीं आणि त्यांनीं आपल्या सहकारी क्षेत्रांतच शक्य तो व्यवहार वाढवावा, असा अभिप्राय रिझर्व्ह बँकेच्या डिसेंबरच्या बुलेटिनमध्यें, बँकेच्या अॅ. के. खात्याचे मुख्य अधिकारी श्री. के. सुबराव, ह्यांनीं आपल्या लेखांत व्यक्त केला आहे. ह्या त्यांच्या मतास कोणाचा विरोध असण्याचें तत्त्वतः कारण नाहीं; परंतु सहकारी क्षेत्राकडे दुर्लक्ष करून ह्या बँका व्यापारी क्षेत्रांत जातात किंवा काय, हाच महत्त्वाचा प्रश्न आहे.

सहकारी बँका व्यापारी बँकिंग करूं लागल्यामुळें प्राथमिक सहकारी सोसायट्यांना कर्ज मिळण्यास अडचण वाटत आहे काय ? व्यक्तिशः सभासदांना कर्जें दिल्यामुळें प्राथमिक सहकारी संस्थांची उपासमार होत आहे काय ? सहकारी बँकांच्या व्यवस्थेंत आणि कारभारांत व्यक्तिशः भागदारांचें प्राबल्य असलें, म्हणजे व्यापारी बँकिंगच्या धंद्याकडे सहकारी बँकांची सहाजिकच प्रवृत्ति होते, असें श्री. सुबराव म्हणतात. परंतु, असें मोठ्या प्रमाणावर वास्तविक घडलें आहे काय ? व्यक्तिशः सभासदांच बोर्डांत मताधिक्य असलें कीं त्यामुळें सहकारी संघटनेशीं जिव्हाळ्याचा संबंध नसणारांनाहि भरमसाट कर्जें दिलीं जातात, अशी परिस्थिति रिझर्व्ह बँकेस आढळून आलेली नाहीं. मुंबईपुरतें पाहिलें, तर प्रांतिक बँकेंत व्यक्तिशः सभासदांच्या हातीं ४०% भाग असून तिच्या १५ डायरेक्टरांपैकीं ७ डायरेक्टर त्यांचेच आहेत. तिनें व्यक्तिशः दिलेल्या कर्जांचें प्रमाण ३०% आहे. इतर कांहीं प्रांतांत व्यक्तिशः भागदारांस अधिक प्रतिनिधित्व असूनहि व्यक्तिशः व्यवहाराचें प्रमाण ह्याहून कमीच आहे आणि मद्रास, बिहार, बंगाल इत्यादि प्रांतांत व्यक्तिशः भागदार कमी असून बँकांचा व्यक्तिशः व्यवहारहि कमीच आढळतो. भांडवलाच्या मालकीहक्कांत व्यक्तिशः सभासदांची जागा सोसायट्या जितक्या अधिक प्रमाणांत घेतील, तितक्या ज्यास्त प्रमाणांत बँकांचा "सहकारी" व्यवहार वाढेल, अशी श्री. सुबराव ह्यांची अपेक्षा आहे. लायक सोसायट्यांना कर्जें नामंजूर करून त्यांची नड न भागवतां सहकारी बँका व्यक्तिशः कर्जें देऊन व्यापारी बँकिंगमध्यें नफा मिळविण्यास चटावल्या आहेत, असा ह्या विचारसरणीचा अर्थ असेल, तर तो सहकारी बँकांना मान्य होणार नाहीं. नव्या प्राथमिक सोसायट्या स्थापन करण्याचें त्यांचें आवश्यक काम नसतांनाहि बँका तें काम हातीं घेऊन सहकारी सोसायट्यांना प्रोत्साहन देत आहेत. उरलेला शिलकी पैसा गुंतविण्याचा प्रश्न जेव्हां उपस्थित होतो, तेव्हां हा जादा पैसा सहकारी क्षेत्राबाहेर शक्यतो जाऊं न देण्याचा त्यांचा प्रयत्न असतोच आणि व्यक्तिशः सभासदांना शेत-मालाचे तारणावर दिलेला पैसा निदान शेतकी क्षेत्राचे बाहेर तरी जात नाहीं. शिलकी पैसा सरकारी रोख्यांत मध्यवर्ती बँकांनीं न गुंतवतां तो प्रांतिक बँकेच्या स्वाधीन करावा, असें श्री. सुबराव म्हणतात. सहकारी तत्त्वास हें अगदीं धरून असलें, तरी प्रांतिक बँक तरी आपला पैसा आज सुद्धा सहकारी संस्थांमध्येंच कोठें पेरूं शकत आहे ? सहकारी बँका सरकारी रोखे, ठेवी, शेतीचा माल, सोनें इत्यादींचे तारणावर कर्ज देतात; त्याचप्रमाणें बिलांची व हुंड्यांचीं वसुली, ड्राफ्ट देणें, इत्यादि बँकिंगचे व्यवहारहि त्या करतात. हे व्यवहार किफायतशीर असले तरी ते सहकारी स्वरूपाचे नाहींत आणि सहकारी बँकांच्या शिकाऊ डायरेक्टरांच्या बँकिंगच्या ज्ञानाच्या आवाक्याबाहेरचे ते आहेत, असें श्री. सुबराव ह्यांचें म्हणणें आहे. तें सहजीं पटण्याजोगें नाहीं.

सहकारी बँकांस व्यापारी बँकिंग कां करावें लागत आहे आणि तें केलें नाहीं, तर सहकारी बँकिंगहि करणें कसें कठीण जाईल, हें विस्तारानें सिद्ध करतां येण्याजोगें आहे. सहकारी बँकांना सहकारी ध्येयापासून च्युत होऊं न देता, त्यांना सहकारी क्षेत्रांतच बंदिस्त ठेवण्याचा श्री. सुबराव ह्यांचा आग्रह हा कांहीं नवीन नाहीं. परंतु, प्राथमिक सहकारी संस्थांचें अस्तित्वच नाममात्र अथवा बिगर-सभासदांशीं व्यवहार करण्यावर अवलंबून असण्याची परिस्थिति दिसूं लागली असतांना, मध्यवर्ती व प्रांतिक बँकाहि त्यास अपवाद कशा ठरणार ? पैसा सुरक्षितपणें गुंतवण्यास पुरेसें सहकारी क्षेत्र कसें निर्माण होईल, हाच महत्त्वाचा प्रश्न आहे; आणि तो सोडविल्याखेरीज, त्यांना इतरत्र पैसे गुंतविण्यास केवळ बंदी केल्यानें सहकारी बँकांचे सहकारी क्षेत्रांतील पैशाचे व्यवहार आपोआप वाढणार नाहींत, हें लक्षांत ठेवूनच व्यावहारिक योजना केली पाहिजे.

---

**ग्राहकांच्या विरोधाचा परिणाम**—न्यूयॉर्क बाजारांत गेल्या आठवड्यांत १ डझन अंड्यांची घाऊक किंमत ४५ सेंटपर्यंत घसरून सुद्धां त्यांना गिऱ्हाईक मिळणें कठीण जात होतें. त्याच वेळीं विक्रीची किंमत दर डझनाला ६३ ते ७९ सेंट इतकी होती. अंड्यांच्या चढत्या किंमतींना गिऱ्हाइकांनीं माल विकत घेण्यास विरोध केल्यामुळें घाऊक बाजारांतील किंमती घसरल्या असा अंदाज आहे. रोजच्या गरजांच्या वस्तूंच्या किंमती भलत्याच वाढल्या तर ग्राहकांनीं संप करण्याची लाट अलीकडे अमेरिकेंत वारंवार येऊं लागली आहे.

**साखरेच्या कारखान्याचें यंत्रसाहित्य**—गेल्या कांहीं महिन्यांत हिंदुस्थानांत दोन साखरेच्या कारखान्यांची संपूर्ण यंत्रसामुग्री आयात झाली आहे. ह्या दोन्ही कारखान्यांची मिळून रोजी ५०० ते ६०० टन ऊंस गाळण्याची तयारी आहे. ह्याशिवाय रोजीं २,००० टन ऊंस गाळूं शकणाऱ्या एका मोठ्या कारखान्याचीहि बरीच यंत्रसामुग्री आली आहे. साखरेच्या कारखान्यांचें साहित्य बनविणाऱ्या इंग्लंडमधील तज्ञ कारखानदारांच्या मतें, साखरेच्या यंत्रसामुग्रीला हिंदुस्थान ही उत्कृष्ट बाजारपेठ आहे.

## श्री. वामनराव पुंडलीक वर्दे

### जीवन वृत्तांत व कार्य परिचय

(बँक ऑफ महाराष्ट्र लि, पुणें चे प्रारंभीपासूनचे उपाध्यक्ष व एक संस्थापक-डायरेक्टर श्री. वा. पुं. वर्दे ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या मुंबई स्थानिक बोर्डावर हिंदुस्थान सरकारनें नुकतीच नेमणूक केली आहे. ह्या नेमणुकी-मुळें श्री. वर्दे ह्यांना बँकेचें संचालकत्व सोडावें लागलें आहे. बँकेच्या डायरेक्टरांनीं नेक ना. डॉ. बाबासाहेब जयकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली श्री. वर्दे ह्यांचा गेल्या रविवारीं सन्मान केला. ह्या प्रसंगानें, श्री. वर्दे ह्यांच्या जीवन वृत्तांताचा परिचय आम्हीं येथें करून देत आहों.)



श्री. वर्दे यांचा जन्म १८९८ सालीं सावंतवाडी संस्थानांतील बांबुळी या गांवीं झाला. या गांवीं त्यांचें आजोळ आहे.

श्री. वर्दे यांचे वडील वेंगुर्ल्याच्या इंग्रजी हायस्कूलचे हेडमास्तर होते. तेथून ते रत्नागिरी हायस्कुलांत बदलून गेले. तेथें श्री. वर्दे दोन वर्षांचे झाले नाहींत तोंच त्यांचे वडील टॉयफाइडचें निमित्त होऊन वयाच्या ३५-३६ व्या वर्षी निधन पावले.

श्री. वर्दे ह्यांच्या मातुःश्रीवर त्या वेळीं काय प्रसंग गुदरला असेल याची कल्पनाच केली पाहिजे. मृत्युपेक्षांही दुःसह असें वैधव्य; त्यांत सहा मुलांच्या पोषणाची जबाबदारी. नाना तऱ्हेचे कष्ट सोसून अत्यंत गरिबींत पण स्वाभिमानास धक्का न लावतां आपल्या मुलांस त्यांनीं वाढविलें, त्यांस सुशिक्षण दिलें, शिस्त लावली, स्वावलंबन शिकविलें. मुलांनीं मातेच्या महत्त्वाकांक्षेचे पांग फेडले. सर्व मुलगे स्वपराक्रमानें सुस्थितींत पडलेले, नांवलौकिक मिळविते, समाजकार्यधुरंधर झालेले पाहून त्यांच्या मातुःश्रीनें १९३७ सालीं समाधानानें देह ठेविला.

१९१४ सालीं श्री. वर्दे रत्नागिरी हायस्कूलमधून मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण झाले. १९१८ सालीं म्हणजे वयाच्या २० व्या वर्षी त्यांनीं बी. कॉम.ची परिक्षा दिली.

### व्यापारी क्षेत्रांतील उमेदवारी

श्री. वर्दे यांनीं परीक्षा पास झाल्यावर १९१९ सालीं टाटा इंडस्ट्रियल बँकेंत कारकुनी नोकरी पत्करली. तेथून १९२१ सालीं ते युनियन बँकेंत गेले. येथें असतांना मोठा पगार न मिळाला तरी सरकारी रोख्यांच्या व्यवहाराच्या कामाचा अनुभव त्यांना फारच मिळाला. उत्तरायुष्यांतील शेअर दलालीच्या धंद्यांत या ज्ञानाचा त्यांना फार उपयोग झाला आणि शेअरदलालपेक्षां सिक्यूरिटी ब्रोकर म्हणूनच ते जास्त प्रसिद्ध आहेत. १९२२ सालीं ते बाँबे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेंत गेले. तेथें त्यांनीं बारा वर्षे-पर्यंत काम करून १९३४ सालीं नोकरीचें त्यागपत्र दिलें. त्या वेळीं ते चीफ अकाउंटंटच्या जागेवर होते. १९१९ पासून १९३४ पर्यंतचा पंधरा वर्षांचा काळ हा श्री. वर्द्यांच्या व्यापारी क्षेत्रांतील उमेदवारीचा काळ होता. या पंधरा वर्षांत बँकिंगच्या धंद्यांतील सर्व बारिकसारिक खांचाखोंचा त्यांनीं शिकून घेतल्या. धंदेवाईक लोकांशीं संबंध आला. व्यापारी लोक कसे वागतात, सौदे कसे करतात, वगैरे समजून आलें; विविध प्रकारच्या मनुष्यस्वभावाशीं परिचय झाला. याहून मोठा फायदा म्हणजे सहकारी बँकेंत काम करीत असल्यामुळें गेल्या पिढींतील सुप्रसिद्ध कार्यकर्त्यांशीं परिचय झाला. त्यामुळें सहकारी चळवळींत ते लक्ष घालूं लागले. एतद्विषयक वाङ्मयांचें वाचन झालें.

### यशस्वी शेअर ब्रोकर

इतक्यांत आर. आर. नाबर कंपनीचे मालक कै. रामभाऊ नाबर यांनीं त्यांना आपल्या कंपनीचा भागीदार म्हणून येतां कीं काय असें पाचारण केलें आणि विशेष विचार न करितां श्री. वर्द्यांनीं तें आमंत्रण स्वीकारलें.

श्री. नाबर हे पहिले महाराष्ट्रीय शेअरब्रोकर. बी. ए. ची परीक्षा पास झाल्यावर नोकरी न करितां ते धडाडीनें शेअर ब्रोकरच्या धंद्यांत पडले आणि ज्या वेळीं शेअर बाजारकडे एकही महाराष्ट्रीय फिरकत नसे, अशा काळीं आपल्या महाराष्ट्रीय फेट्याचा ध्वज त्यांनीं फडकत ठेवला.

१९३७ सालीं श्री. नाबर दिवंगत झाल्यानंतर आर. आर. नाबर कंपनीचे श्री. वर्दे पूर्ण मालक झाले आणि त्याच नांवानें आज बारा वर्षे ते शेअर व सिक्युरिटीज् ब्रोकर म्हणून धंदा करीत आहेत.

श्री. रामभाऊ नाबरांच्या पश्चात् नाबर कंपनीचें नांव श्री. वर्द्यांनीं राखलें, इतकेंच नव्हे, तर अधिक उज्ज्वल केलें. नाबर कंपनी-मार्फत व्यवहार केल्यास फसण्याचा संभव कमी, असा विश्वास बाहेरगांवच्या गिऱ्हाइकांत दृढ आहे. गिऱ्हाइकाचें हित तें आपलें हित अशा तत्त्वावर तेथें धंदा चालतो असा लौकिक या कंपनीनें मिळविला आहे.

### कनिष्ठ नोकराचा मॅनेजिंग डायरेक्टर

१९३४ सालीं मुंबई प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँकेंतील नोकरी सोडल्यानंतर श्री वर्दे त्याच बँकेच्या डायरेक्टराच्या जागेसाठी उमेदवार म्हणून उभे राहिले व अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांतर्फे निवडूनही आले. त्या वेळेपासून ते वर्षानुवर्ष डायरेक्टर म्हणून निवडले जात आहेत. १९४६ सालीं या बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैकुंठराय मेहता हे मुंबई प्रांताचे अर्थमंत्री झाले. त्यामुळें त्यांना मॅनेजिंग डायरेक्टरची जागा सोडणें प्राप्त झालें. श्री. वर्द्यांनीं मॅनेजिंग डायरेक्टरची जागा श्री. मेहतांच्या अत्याग्रहा-वरून, वेतन न घेतां पत्करली व श्री. वर्दे प्रॉव्हिन्शियल बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर झाले. ज्या बँकेंत १९२२ सालीं कारकून म्हणून त्यांनीं प्रवेश केला, तेथेंच चोवीस वर्षांनीं मुख्य डायरे-क्टरची खुर्ची सन्मानपूर्वक त्यांनीं भूषविली.

बाँबे प्राव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मॅनेजिंग डायरे-क्टरची जागा हें श्री. वर्द्यांनीं सतत पंचवीस वर्षे सहकारी चळवळीच्या प्रगतीसाठी जें कार्य केलें होतें, जी तपश्चर्या केली होती, तिचें फळ होतें. या सहकारी चवळींतील कार्याचा आरंभ त्यांनीं सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेपासून केला. ही बँक एक छोटी पतपेढी म्हणून १९१८ सालीं स्थापन झाली. दोन-तीन वर्षेपर्यंत तिचें काम रडतकडत चाललें होतें. १९२१ सालीं श्री. वर्दे त्या बँकेचे सेक्रेटरी झाले आणि १९३० पर्यंत त्यांनीं सेक्रेटरीचें काम केलें. १९३२ सालीं अध्यक्षपदावर त्यांची निवडणूक झाली, त्यापासून आजतागायत या संस्थेचीं सूत्रें अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं चालविलीं आहेत. सारस्वत बँकेनें केलेली अभिनंदनीय प्रगति आणि तिचें समाजसेवेचें धोरण, हीं सुप्रसिद्धच आहेत.

### विविध संस्थांना मार्गदर्शन

श्री. वर्दे यांनीं आपल्या बँकिंग विषयांतील ज्ञानाचा व संघटना-

## हें दुष्ट चक्र कोण व कसें सोडविणार ?

( भा. म. का. )

हिंदच्या आर्थिक परिस्थितीचा समाजांतील निरनिराळ्या जबाबदार घटकांच्या दृष्टीनें विचार केला असतां पुढील प्रकारची परिस्थिति आढळते. मालक, कारखानदार, भांडवलवाले ह्या वर्गाच्या दृष्टीनें विचार करतां, कोणताहि नवीन कर सहन करण्याची ह्या वर्गाची तयारी तर नाहींच व सध्यांच बसविण्यांत आलेल्या करांत कोणकोणत्या प्रकारें सवलत मिळेल त्या एकाच गोष्टीकडे धंद्यावरील संकटमय परिस्थितीमुळें साहजिकच त्या वर्गाची दृष्टि वळली आहे. राष्ट्रीयीकरण, औद्योगिक नफ्यांत मजुरांचा वाटा ह्या नवीन कल्पनांमुळेंहि त्या वर्गाला धक्का बसला आहे. आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं ह्या वर्गाला संतुष्ट राखलें पाहिजे किंवा कारखानी मालाच्या उत्पादनासाठीं दुसरा एखादा मार्ग शोधून काढला पाहिजे. पण तें आजच्या स्थितींत शक्य दिसत नाहीं.

आपल्या समाजांतील दुसरा एक घटक म्हणजे कारखान्यांतील मजूर वर्ग. वाढत्या महागाईप्रमाणें पगारांत प्रमाणशीर वाढ पाहिजे ही या वर्गाची रास्त मागणी आहे व ती न पुरविली गेल्यास संपाची भाषा बोलली जाते हेंहि योग्यच आहे. कारण, ह्या वर्गाला प्रत्येक वस्तू पैसा देऊनच विकत घ्यावी लागते. याशिवाय बदलणाऱ्या काळप्रवाहाबरोबर हा वर्ग नवीन हक्कांची, उ० कामाचे कमी तास, इतर अनेक सुखसोई, रहाण्यासाठीं घरें किंवा खोल्या, म्हातारपणची तरतूद, इत्यादि गोष्टींची सहाजिकच अपेक्षा करीत आहे. वाढत जाणाऱ्या महागाईमुळें त्या वर्गाच्या पगाराला किंवा महागाई-भत्त्याला कात्री लावणें केव्हांहि शक्य नाहीं.

समाजांतील तिसरा एक घटक म्हणजे सरकारी नोकर वर्ग. ह्या वर्गाची परिस्थिति जवळ जवळ मजूर वर्गाप्रमाणेंच आहे. कारण यांतील बहुसंख्य लोक मासिक पगारावरच अवलंबून असतात. तेव्हां त्यांचा पगार इत्यादींत कपात करतां येत नाहीं. अर्थात् अगदीं मोठ्या पगाराच्या ज्या कांहीं जागा असतील त्यांची गोष्ट निराळी. त्यांच्या बाबतींत आजहि किंचित् कपात करतां येईल.

समाजांतील चवथा वर्ग म्हणजे खेडेगांवांत रहाणारा बहुसंख्य शेतकरी वर्ग. ह्या वर्गापैकीं कांहीं लोकांना जमीन महसूल, पाणी-पट्टी हा प्रत्यक्ष कर द्यावा लागतो व बाकीचे सर्व अप्रत्यक्ष स्वरूपांत कर द्यावे लागतात. जमीन महसुलांत वाढ झालेली नाहीं; परंतु इतर अनेक अप्रत्यक्ष करांचें दडपण वाढत्या कर-लादणीमुळें वाढतच चाललें आहे. ह्या वर्गाच्या दृष्टीनें आशाजनक एकच बाजू. ती म्हणजे गेल्या चार वर्षांत धान्याच्या वाढलेल्या बाजारभावामुळें शेतकरी वर्गाच्या हातांत जास्त पैसा खेळत असल्यामुळें तो कांहींसा कर्जमुक्त होऊन त्याची परिस्थिति किंचित सुधारत आहे. परंतु याहि वर्गाची सहनशक्ति वाढलेले अप्रत्यक्ष कर सोसण्याची नाहीं. म्हणजे हाहि वर्ग अप्रत्यक्ष करांचें ओझें कमी व्हावें अशी अपेक्षा करतो.

अर्थव्यवस्थेंतील पांचवा घटक म्हणजे व्यापारी व अडते लोकांचा. हल्लींच्या परिस्थितींत एकाप्रकारें सर्वांत जास्त फायदा ह्याच वर्गाचा झाला आहे. परंतु ह्या वर्गाचा करपद्धतीशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं व याहि वर्गाला अनेक अप्रत्यक्ष कर सोसावे लागतात. हे सहन करण्याची ह्या वर्गाची पात्रता आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

अर्थव्यवस्थेंतील आणखी एक, सहावा घटक म्हणजे डॉक्टर्स, वकील इ. स्वतंत्र व्यवसाय करणारे लोक. ह्याहि लोकांना अप्रत्यक्ष करच सोसावे लागतात व ह्यांचें उत्पन्न वाढत असल्यामुळें हा वर्ग कर-भार सहन करूं शकतो. अर्थात पांचव्या व सहाव्या गटांतील लोकांना उत्पन्नानुरूप प्राप्तीवरील कर हा प्रत्यक्ष कर भरावा लागतोच.

आज सरकारपुढें जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें व तुटीच्या ऐवजी शिल्लक दाखविणारें अंदाजपत्रक तयार करणें हा मुख्य प्रश्न आहे. शिलकी अंदाजपत्रक तयार करावयाचें म्हणजे खर्चात काटकसर करणें व करांचें उत्पन्न वाढविणें. परंतु समाजांतील कोणताहि घटक कर वाढवून घेण्यास तयार नाहीं, तर करांत सवलतीची अपेक्षा करीत आहे. सरकारनें स्वतः खर्चात काटकसर करणें हेंहि अगदीं अल्प प्रमाणांत शक्य आहे. परंतु सध्यांची परिस्थिति सुधारावयाची तर प्रथम कोठें तरी सुरवात केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. यंदाच्या अंदाजपत्रकांत असा निश्चित प्रयत्न दिसेल काय ?

---

## किंमती खालीं आणण्याची आवश्यकता

हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार डॉ. पी. जे. थॉमस ह्यांनीं दिल्ली येथें नुकतेंच एक भाषण केलें. ह्या भाषणांत त्यांनीं सरकारला असा इशारा दिला कीं, हळुहळु कां होईना, पण वस्तूंच्या किंमती खालीं आणल्या नाहींत तर हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेवर आर्थिक अरिष्ट कोसळण्याचा धोका आहे. संभाव्य मंदीचीं लक्षणें सांगतांना त्यांनीं कांहीं गोष्टींचा उल्लेख केला आहे. तो लक्षांत घेण्यासारखा आहे. सध्यां देशांत चलनवृद्धीची सीमा झालेली असतांना सुद्धा आर्थिक व्यवहारांत पैशाची चणचण भासत आहे. पैसे गुंतविण्याबाबत एक प्रकारचा अगतिकपणा दिसून येतो; बाजारांत मालाची विक्री न झाल्यामुळें तो सांठून राहिला आहे; बेकारी वाढत आहे. हीं सर्व लक्षणें आर्थिक दुरवस्थेच्या दुर्दैवी पावलांचीं आहेत ह्यांत शंका नाहीं. डॉ. थॉमस ह्यांनीं ह्यासंबंधांत अमेरिकन अर्थव्यवस्थेसंबंधीं काढलेले उद्गारहि सूचक आहेत. गेल्याच आठवड्यांत अमेरिकेंतील शेअर बाजारांत मंदी उसळल्याची वार्ता आली आहे. तथापि, डॉ. थॉमस ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें अमेरिकेचें उत्पादन युरोपिअन राष्ट्रांच्या मदतीचा कार्यक्रम आणि शस्त्रास्त्रांची निर्मिती ह्यांच्या जोरावर अजून बऱ्याच प्रमाणावर चालू आहे. हिंदुस्थानांत मात्र तशी परिस्थिति नाहीं. त्यामुळें चलनवृद्धीचे परिणाम हिंदुस्थानांत अधिक व्यापक आणि धक्के देणारे होतील. किंमती उतरल्या तर त्यामुळें उत्पादनाला उत्तेजन कमी मिळेल आणि त्यामुळें बेकारींतहि वाढ होईल हें खरें; पण डॉ. थॉमस ह्यांच्या मतें अखेर त्यामुळेंच आर्थिक व्यवस्था सुधारेल. चढत्या किंमतींमुळें हिंदुस्थानांतील दीर्घकालीन आर्थिक पुनर्घटनेचे कार्यक्रम हातीं घेतां येत नाहींत. ह्या कार्यक्रमासाठीं परदेशच्या चलनाची जरूरी, जागतिक बँकेकडून भागेल तितकी भागवून बाकीचा पैसा देशांतच उभारावा ही डॉ. थॉमस ह्यांची सूचना योग्यच आहे. हा पैसा शेतकी करणाऱ्या जनतेपासून आणि छोट्या व्यापाऱ्यांकडूनच उभारावा ही त्यांची सूचना मात्र व्यवहार्य वाटत नाहीं. एक तर किंमती घसरल्यावर ह्या वर्गाचीच फार तारांबळ उडेल; शिवाय मोठ्या पुनर्घटनेच्या कार्यक्रमासाठीं लागणारा पैसा कवडी-रेवडीनें उभारणें शक्य होत नाहीं. म. गांधी स्मारक फंडावरून ही गोष्ट सिद्ध झाली नाहीं काय ?

### अमेरिकेची वाढती श्रीमंती

अमेरिका आज जगांत संपत्तीच्या उत्पादनाच्या व भांडवलाच्या संचयाच्या दृष्टीनेंहि इतर कोणत्याहि देशापेक्षां श्रेष्ठ आहे. आंतरराष्ट्रीय बँकेचींहि इतर देशांना कर्जें देण्याची यशस्विता अमेरिकेंत उभारल्या जाणाऱ्या कर्जांवरच अवलंबून आहे. १९४८ सालीं २२४ हजार अब्ज डॉलर्स इतकें प्रचंड वार्षिक राष्ट्रीय उत्पादन अमेरिकेंत झालें. पोलादाचें उत्पादन ९५० लक्ष टन, हें जागतिक पोलादाच्या उत्पादनाच्या ६३ टक्के होतें. तांबें, कोळसा, सिमेंट व पेट्रोल ह्यांचें वार्षिक उत्पादन जागतिक उत्पादनाच्या अनुक्रमें ३८, ४८, ४२ व ६५ टक्के ह्या प्रमाणांत होतें. रशिया वगळून बाकीच्या जगांत पिकणाऱ्या अन्न–धान्याच्या सुमारें ३४ टक्के उत्पादन एकट्या अमेरिकेंत झालें. कापसाचें उत्पन्न एकंदर जागतिक उत्पादनाच्या जवळ जवळ निम्में आहे. गेल्या वर्षांतील उत्पन्नाच्या जोडीला संचित भांडवल किती असेल याची कल्पना केली, व अमेरिकेची लोकसंख्या १२ कोटींचे सुमारास म्हणजे जागतिक लोकसंख्येच्या ५ टक्के आहे असें लक्षांत आणलें म्हणजे अमेरिकेच्या श्रीमंतीची बरीच कल्पना येण्यासारखी आहे. भौगोलिक दृष्ट्या अमेरिका स्वयंपूर्ण आहे व ब्रिटनप्रमाणें आपल्या आर्थिक परिस्थितीसाठीं ती केवळ निर्गत व्यापारावर अवलंबून नाहीं. याचें एक मुख्य लक्षण म्हणजे अमेरिकेंत तयार होणाऱ्या विविध मालापैकीं शेकडा ९२ ह्या प्रमाणांत माल खुद्द अमेरिकेंतच खपला जातो. ह्या एका गोष्टीवरूनच अमेरिकेची आर्थिक श्रेष्ठता व त्याचबरोबर बरीचशी स्वतंत्र स्वयंपूर्ण भूमिका लक्षांत येते. अमेरिकेचे नवीन वकील मि. हेंडर्सन ह्यांनीं नुकतीच हिंदुस्थानांत कलकत्ता, बनारस इ. ठिकाणीं भाषणें केलीं. हीं भाषणें उद्बोधक तर आहेतच, परंतु विशेषत: अमेरिकेच्या असाधारण बळकट आर्थिक परिस्थितीवर प्रकाश पाडणारीं आहेत. हिंदला आज परकी भांडवलाची गरज आहे. अमेरिका कांहीं प्रमाणांत योग्य अटींवर भांडवल पुरवूं शकेल व त्यापासून भीति बाळगण्याचें कारण नाहीं, असें दिसतें.


## Bombay Provincial Co-operative Institute.

### EXECUTIVE OFFICER

Applications stating age and qualifications are invited for the post of **Executive Officer** of the Bombay Provincial Co-operative Institute. The Officer will be responsible for the administrative functions including the supervision of the Co-operative Schools and Training classes in the districts. Salary of the post is 300–20–600 with travelling allowance admissible to Officers of the Government of Bombay.

**Qualifications:** Graduate in economics, commerce or agriculture with a good honours or second class degree and with experience of co-operative movement will be preferred. Higher starting salary may be given to suitable candidate. The post is open to persons in the service of co-operative institutions or the Co-operative Department.

Applications should be addressed to Mr. V. P. Varde, Hon. Secretary, Bombay Provincial Co-operative Institute, 9, Bakehouse Lane, Fort, Bombay and should reach him on or before the 21st February 1949.



## NOTICE.

### THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LTD., POONA.

Notice is hereby given that the Twelfth Ordinary General Meeting of the Share-holders of the Presidency Industrial Bank, Ltd., Poona, will be held on Friday the 25th February 1949, at the "Commonwealth Building," Laxmi Road, Poona, at 4 P. M. to transact the following business:—

1. To receive and consider the Profit and Loss Account the Balance Sheet, and the Report of the Directors and Auditors for the year ending 31st December, 1948.
*2. To declare a Dividend.
3. To elect three Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election. M/s. D. G. Bapat, S. K. Bhave and W. P. Vaidya retire and offer themselves for re-election. Mr. M. M. Gadre and Mr. L. M. Joshi, co-opted Directors, also retire.
4. To appoint Auditors and to fix their remuneration.
5. To confirm the contribution of Rs. 5,000 given by us to the "Mahatma Gandhi Memorial Fund."
6. To transact any other business as may be allowed by the Chairman.

By order,

Poona City, 5–2–1949 — **C. T. Chitale,** Managing Director.

*The transfer books of the Bank will be closed from 16th to 28th February 1949.

The Dividend when sanctioned by the General Meeting will be payable on and after 11th March 1949. The Dividend Warrants will be posted to the Registered Addresses of the Share-holders. Any change in address should be immediately intimated.





### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ११५१। आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.